



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २४९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२१ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## सातारा जिल्हा परिषदेतील राडा भोवला,
## SP तुषार दोशींची ११ महिन्यांत उचलबांगडी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, सातारा :** जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडणुकीत झालेला राडा पोलीस अधीक्षक तुषार दोशींना चांगलाच भोवला आहे. दोशी यांची आज सांगलीला बदली करण्यात आली आहे. तर निखिल पिंगळे यांची साताऱ्याचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. २२ मे २०२५ रोजी दोशी हे साताऱ्याचे पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाले होते. मात्र, ११ महिन्यातच त्यांची उचलबांगडी झाली आहे. जालना आणि सातारा येथील त्यांचा कार्यकाळ अत्यंत वादग्रस्त ठरला आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडणुकीत प्रशासनाची भूमिका अत्यंत वादग्रस्त ठरली होती. पोलिसांनी पालकमंत्री शंभूराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील आणि राज्यसभा खासदार नितीन पाटील यांना धक्काबुक्की केली होती. पोलिसांशी झालेल्या झटापटीत शंभूराज देसाई हे जखमी झाले होते. तर मकरंद पाटील हे खाली पडले होते. भाजपाचे एक मंत्री, काही आमदार आणि कार्यकर्त्यांना पोलिसांनी कोणतीही अडवणूक न करता जिल्हा परिषद इमारतीत प्रवेश दिला होता. त्या ठिकाणी साताऱ्याचे नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि एक गुंड प्रवृत्तीचा कार्यकर्ता देखील उपस्थित होता.

**नेमकं कोणतं प्रकरण तुषार दोशींना भोवलं?**

सातारा झेडपीत २० मार्च रोजी झालेला राडा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला होता. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसकडे सत्ता स्थापनेसाठी पूर्ण बहुमत असताना हाय व्होल्टेज ड्रामा झाला होता. राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांना मतदानापासून रोखत अपहरणाच्या कथित गुन्ह्यात अटक केली होती. त्याचबरोबर शिवसेनेचे दोन सदस्य देखील भाजपने फोडले होते. या नाट्यमय घडामोडींमुळे सातारा झेडपीची सत्ता भाजपच्या ताब्यात गेली. मंत्र्यांना झालेल्या धक्काबुक्कीचे पडसाद विधान परिषदेच्या सभागृहात उमटले. त्यानंतर काही दिवस एसपी तुषार दोशींना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते.

काही दिवसांपूर्वीच तुषार दोशींनी पुन्हा कार्यभार घेतला होता. त्यानंतर आज सायंकाळी त्यांची सांगलीच्या पोलीस अधीक्षकपदी बदली झाल्याचा आदेश प्राप्त झाला. दोशी हे मूळचे रायगड जिल्ह्यातील महाडचे आहेत. फर्ग्युसन कॉलेज पुणे येथून त्यांनी बी.एस्सी. पूर्ण केली. २००० साली पोलीस उपअधीक्षक म्हणून त्यांची निवड झाली होती. पहिली पोस्टींग चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथे नक्षली प्रभाव असलेल्या ठिकाणी झाली होती. आतापर्यंत त्यांनी लातूर शहर, सोलापूर, पुणे, नवी मुंबई, जालना आणि सातारा येथे सेवा बजावली आहे. २०१४ साली त्यांना पोलीस अधीक्षक म्हणून पदोन्नती मिळाली होती. तुषार दोशी यांच्यासह राज्यातील ९ IPS अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

## नायगांव येथे ब-याच दिवसापासून रखडलेल्या शेतरस्त्यास प्रारंभ




**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२०, धाराशिव :** कळंब तालुक्यातील नायगाव येथील गट नंबर ३९२,३९३,४००,४०१,४०२,४०३ व ४०६ या गटातील मागणी असलेला व गेल्या २० वर्षांपासून बंद असलेला नंबरीबांधाचा शेतरस्ता श्रीमती वर्षाताई ढेकरे मंडळ अधिकारी नायगांव व संजयकुमार माळी ग्राम महसूल अधिकारी नायगाव यांच्या भर उन्हात या रस्त्यावर उपस्थितीत राहून सर्व शेतकरीवर्गास शेतातील रस्त्याबद्दलचे महत्व सांगत वाद विवाद न होता अंदाजे ७०० ते ८०० मीटर रस्ता खुला केला. रस्ता खुला झाल्याने अर्जदारांसहित अनेक शेतकरी बांधवांना आपली शेती विना अडथळा करता येणार आहे.

या कामास आज अखेर दि.२० रोजी प्रारंभ झाला यामुळे या भागातील बळीराजाची आता रस्त्यांची गैरसोय कायमची थांबणार यामुळे त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले, हा रस्ता कायमस्वरूपी खुला करण्यासाठी मंडळ अधिकारी नायगांव वर्षाताई ढेकरे, ग्राम महसूल अधिकारी संजयकुमार माळी व संबंधित गटातील शेतकरी व्यंकट यशवंता माळी, बळवंत यशवंता माळी, विजयकुमार चांडक, शिवाजी बाजीराव होदाडे, सोमनाथ मुकिंदा घोडके, महालदार मुकुंदा घोडके, अनिल वसंत नाडे, वैजनाथ काशिनाथ घोडके व ईतर शेजारी शेतकरी उपस्थित होते.

# नागपुरातही कॉर्पोरेट धर्मांतरण, अत्याचाराचे नाशिक पॅटर्न!

## चार तरुणींच्या तक्रारीनंतर संस्थेच्या मालकाला अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नागपूर :** नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या धर्मांतरण दबाव आणि महिला अत्याचार प्रकरणानंतर आता उपराजधानी नागपूरमध्येही अशाच स्वरूपाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मानकापूर परिसरातील एका स्वयंसेवी संस्थेच्या आड तरुणींचा मानसिक छळ, विनयभंग आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे गंभीर आरोप करण्यात आले असून, या प्रकरणात संस्थेचा संचालक रियाज काझी याला पोलिसांनी अटक केली आहे.

'युनिव्हर्सल मल्टीपर्पज सोसायटी' या नावाखाली चालणाऱ्या संस्थेत काम करणाऱ्या २३ वर्षीय तरुणीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, आरोपी काझी हा




तरुणींना केबिनमध्ये बोलावून अश्लील चाळे करत असे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद करून वारंवार गैरवर्तन केल्याचा आरोप असून, इतर तरुणींनाही चुकीच्या हेतूने स्पर्श केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, संस्थेत काम करणाऱ्या तरुणींवर धार्मिक नियम पाळण्याचा दबाव टाकला जात होता. नमाज, रोजे आणि दुवा करण्यास भाग पाडले जात होते, तसेच अभिवादनासाठी 'खुदा हाफिज' म्हणण्यास सक्ती केली जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब समोर आली असून, तरुणींच्या हालचालींवर डिजिटल पद्धतीने नजर ठेवली जात होती. बनावट सोशल मीडिया खात्यांद्वारे त्यांच्यावर लक्ष ठेवून मानसिक दबाव निर्माण केला जात असल्याचा आरोप आहे. आतापर्यंत चार पीडितांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत रियाज काझीला अटक केली.

मानकापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक हर्ष कळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला असून, भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लासलगाव बाजार समितीची बदनामी थांबवा,
## चुकीच्या बातम्या प्रसिद्ध केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा

### सभापती डी.के. जगताप यांनी मांडली वस्तुस्थिती; नवीन विरुद्ध जुन्या व्यापाऱ्यांच्या वादावर स्पष्टीकरण

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** लासलगाव बाजार समितीच्या कामकाजाविषयी गेल्या काही दिवसांपासून विविध प्रसारमाध्यमांमध्ये चुकीची, एकांगी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत आहे. अशा प्रकारच्या बातम्यांमुळे बाजार समितीची विनाकारण बदनामी होत असून, तथ्यहीन बातम्या प्रसिद्ध करणे तात्काळ थांबवावे, असे आवाहन बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी.के.) जगताप व उपसभापती संदीप दरेकर यांनी पत्रकार परिषदेत केले.

**नेमका वाद काय?**

गेल्या १३ एप्रिल २०२६ रोजी लासलगाव बाजार समितीत काही नवीन परवानाधारक व्यापाऱ्यांनी पूर्वसूचना न देता लिलाव प्रक्रियेत सहभाग घेतला होता. यावरून जुन्या व्यापाऱ्यांनी लिलावावर बहिष्कार टाकल्याने पेच निर्माण झाला. यावेळी कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी बाजार समितीने जो तात्पुरता निर्णय घेतला, त्याचा चुकीचा अर्थ काढून बाजार समिती नवीन व्यापाऱ्यांच्या विरोधात असल्याचे चित्र



> काही घटक खाजगी बाजार व्यवस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी ७९ वर्षांची परंपरा असलेल्या या सहकारी संस्थेची जाणीवपूर्वक बदनामी करत आहेत. जाणीवपूर्वक प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न थांबवला नाही, तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> **- डी.के. जगताप, सभापती**

रंगवले जात असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

**दरांबाबतची 'ती' बातमी तथ्यहीन**

नवीन व्यापाऱ्यांमुळे शेतकऱ्यांना अधिक दर मिळत असल्याचा दावा फेटाळून लावताना सभापतींनी आकडेवारी सादर केली:

**नवीन व्यापारी :** ५९ शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी केली. सरासरी दर रु. ४,९७३ मिळाला.

**जुने व्यापारी :** २२ शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी केली. सरासरी दर रु. ५,३९२ मिळाला. दोन्ही गटांकडे सर्वोच्च दर ५,८०० रुपयेच होता. त्यामुळे नवीन व्यापाऱ्यांमुळेच दर वाढले, हा प्रचार चुकीचा असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

**पारदर्शकतेवर शिक्कामोर्तब**

लिलाव प्रक्रियेत 'खाणाखुणा' वापरल्या जातात या आरोपावर बोलताना त्यांनी सांगितले की, ही एक पारंपरिक पद्धत असली तरी अंतिम दर हा नेहमी 'उघड व स्पर्धात्मक' बोलीनेच ठरतो. लासलगाव बाजार समितीने सलग तीन वर्षे राज्यात अव्वल स्थान पटकावले असून, सहा जिल्ह्यांतील शेतकरी विश्वासाने येथे येतात.

**महत्त्वाची मते :**

**जयदत्त होळकर (सदस्य) :** आजवर एकाही शेतकऱ्याचा रुपया बुडालेला नाही. ही संस्था शेतकऱ्यांच्या कष्टातून उभी राहिली आहे.

**प्रवीण कदम (व्यापारी सदस्य) :** नवीन सभासद नोंदणी प्रक्रियेनुसार सुरू आहे. काही अर्ज प्रलंबित आहेत, त्यावर लवकरच निर्णय होईल. तोपर्यंत लिलावात अडथळा आणू नये.

या पत्रकार परिषदेस बाजार समितीचे संचालक मंडळ, सचिव आणि विविध बाजार घटक उपस्थित होते.

# राणी हिराई यांचा गौरवशाली इतिहास आणि आदिवासी संस्कृती चंद्रपूरचा अभिमान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** गोंडवाना साम्राज्याच्या पराक्रमी शासक राणी हिराई या चंद्रपूरचे वैभव आहेत. त्यांनी आपल्या कुशल नेतृत्वाच्या आणि दूरदृष्टीच्या बळावर सलग १५ वर्षे उत्तम राज्यकारभार चालवला. चंद्रपूर शहराला लाभलेली १७ किलोमीटरची भक्कम तटबंदी व महाकाली मंदिर ही त्यांच्याच कार्याची साक्ष असून, राणी हिराई यांचा इतिहास आणि आपली आदिवासी संस्कृती हा आपल्या सर्वांचा अभिमान असल्याचे प्रतिपादन चंद्रपूरचे आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूरचे वैभव असलेल्या राजमाता राणी हिराई यांच्या जयंतीनिमित्त शहरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी राणी हिराई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील आदिवासी समाजबांधव, विविध संघटनांचे पदाधिकारी, राजकीय प्रतिनिधी आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, राणी हिराई यांच्या अतुलनीय कार्याला मानवंदना देण्यासाठी शहरात त्यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार असून, याकरिता १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, राणी हिराई यांचे शौर्य चित्रांच्या माध्यमातून जिवंत करण्यासाठी शहरात भव्य वॉल म्युरल तयार करण्यात येणार असून, त्यासाठी ३० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. यासोबतच, चंद्रपूरची ओळख असलेल्या ऐतिहासिक कोनेरी तलाव येथे राणी हिराई यांची जीवनगाथा आणि समृद्ध आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक 'लाईट व साऊंड शो' व्यवस्था सुरू करण्याचे नियोजन केले जात असल्याचे ते यावेळी म्हणाले.

पुढील वर्षी हा जयंती महोत्सव आयोजित करत असताना, आधीच सुयोग्य नियोजन करून जिल्ह्यातील संपूर्ण समाजबांधवांना एकत्रित करण्यात येईल. या महोत्सवाची प्रचिती आणि आपला गौरवशाली इतिहास केवळ चंद्रपूरपुरता मर्यादित न राहता, तो संपूर्ण देशात व राज्यात पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला आदिवासी बांधव आणि चंद्रपूरकर नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## अक्षय ऊर्जाघटाच्या दिशेने...


कल्पक्कमच्या अणुभट्टीने ६ एप्रिलच्या रात्री भारताच्या आण्विक कार्यक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. अणुऊर्जानिर्मितीतील या यशामुळे भारताची 'अक्षय ऊर्जाघट' मिळवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. भारताचे हे यश अभिमानास्पद आहे. यामागे मोठा इतिहास आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दि. १९ ऑगस्ट १९४८ रोजी 'इंडियन ॲटोमिक एनर्जी कमिशन'ची स्थापना झाली. त्यानंतर दि. ४ ऑगस्ट १९५६ रोजी तुर्भे येथे पहिली अणुभट्टी कार्यान्वित झाली. ही आशिया खंडातली पहिलीच अणुभट्टी! तिचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. तिचे नामकरण 'अप्सरा' असे करण्यात आले. त्यानंतर १० जुलै १९६० रोजी कॅनडाच्या मदतीने बांधलेली दुसरी अणुभट्टी कार्यान्वित करण्यात आली. तिसरी अणुभट्टी १४ जानेवारी १९६१ रोजी कार्यान्वित करण्यात आली. ती भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांनी उभारली होती. नऊ ऑगस्ट १९६२ रोजी नानगल येथे जड पाणी (हेवी वॉटर) निर्मिती केंद्र उभारण्यात आले. दि. २३ जानेवारी १९६५ रोजी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी तुर्भे येथील प्लुटोनियम प्लान्टचे उद्घाटन केले. १९७४ मध्ये भारताने अणुस्फोट केला, तेव्हा इतकी तयारी झालेली होती. १९६९ सालामध्ये तारापूरमध्ये अणुऊर्जा प्रकल्प उभा राहिला.

आज देशामध्ये तमिळनाडूमध्ये दोन, राजस्थान, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेश इथे प्रत्येकी एक असे सात प्रमुख अणुउर्जा प्रकल्प आहेत. शिवाय जैतापूर (महाराष्ट्र), गोरखपूर (हरयाणा) आणि माही बांसवारा ( राजस्थान) असे तीन अणुऊर्जा प्रकल्प होऊ घातले आहेत. पैकी माही बांसवाराची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आली. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की अणुभट्टी चालविण्यासाठी सतत पुरेशा प्रमाणात युरेनियम – २३५ या मूलद्रव्याचा पुरवठा होत राहणे आवश्यक असते; पण निसर्गामध्ये युरेनियमचा या प्रकारचा साठा मर्यादित आहे. त्याऐवजी युरेनियम – २३८मधून निर्माण होणारा प्लुटोनियम–२३९ हा उत्तम विच्छेदनशील आहे. त्यामुळे अधिकाधिक प्लुटोनिम निर्माण करणारी अणुभट्टी किफायतशीर ठरते. अशा अणुभट्टीला 'ब्रीडर रिॲक्टर' म्हणतात. कल्पक्कममधील अणुभट्टी या प्रकारची आहे.

भारताचा अणुऊर्जेचा कार्यक्रम डॉ. होमी भाभा यांनी १९५४मध्ये तयार केला. दीर्घकालीन विचार करणारा हा तीन स्तरांचा कार्यक्रम आखताना आपल्या देशातील युरेनियमचा मर्यादित साठा लक्षात घेऊन त्यांनी हा कार्यक्रम निश्चित केला. आपल्याकडे युरेनियमचा साठा मर्यादित असला तरी थोरियम मोठ्या प्रमाणात आहे. विशेषतः तमिळनाडू, केरळम्, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या भागात ते विपुल प्रमाणात सापडते. त्याच्या साठ्यातून ऊर्जानिर्मितीमध्ये भारताला स्वयंपूर्ण बनवणे, हे उद्दिष्ट हा कार्यक्रम आखताना भाभा यांनी ठेवले होतं. त्यांनी आखलेले हे धोरण अणुइंधनचक्रावर आधारित आहे. या कार्यक्रमाकडे धावती नजर टाकली तर भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाची एकंदर रूपरेषा स्पष्ट होते. या कार्यक्रमाची पहिली पायरी, प्रचंड दाबाखालील जड पाणी (प्रेशराईज्ड हेवी वॉटर रिॲक्टर्स) अणुभट्टीची आहे. यामध्ये इंधन म्हणून नैसर्गिक युरेनियमचा वापर केला जातो. युरेनियमपासून वीजनिर्मिती करताना उपउत्पादन म्हणून प्लुटोनियम–२३९ तयार होते. दुसरी पायरी फास्ट ब्रीडर रिॲक्टर्सची आहे. यामध्ये इंधन म्हणून पहिल्या टप्प्यातील प्लुटोनियम आणि नैसर्गिक युरेनियमचा वापर केला जातो. या अणुभट्ट्या वापरलेल्या इंधनापेक्षा अधिक नवीन इंधन म्हणजे प्लुटोनियम तयार करतात. थोरियमचे रूपांतर युरेनियम–२३३मध्ये करण्यासाठी ते आवश्यक आहे. कल्पक्कम येथील अणुभट्टीमध्ये या टप्प्याची आता सुरुवात झाली आहे. तिसरी पायरी ही ॲडव्हान्स्ड थोरियम रिॲक्टर्सची आहे. यामध्ये इंधन म्हणून थोरियम आणि दुसऱ्या टप्प्यातील युरेनियम – २३३चा उपयोग असतो. हे तीन टप्पे थोरियमच्या मदतीनं स्वयंपूर्ण ऊर्जानिर्मिती करतील.

**– श्रीराम शिधये**

# मराठी शाळाच दर्जेदार



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.

मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.

जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ – पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.



आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत देखील सीबीएएससीचा अभ्यासक्रम शिकवला जात आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळत आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे.

अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

# पृथ्वी आपलीच आहे की परगृहावरील लोकांची ?

पृथ्वीवर वाढत जाणारे जीवघेणे प्रदूषण,पर्यावरणाची होत असलेली हानी,हवामानात होणारे अनैसर्गिक बदल आणि पृथ्वीचे जतन व संवर्धन याबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २२ एप्रिलला जागतिक वसुंधरा दिन साजरा केला जातो.२२ एप्रिल १९७० रोजी अमेरिकेत पहिला वसुंधरा दिन साजरा करण्यात आला होता.अमेरिकेचे सिनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी जागतिक वसुंधरा दिनाची सुरूवात केली होती.हा दिवस संपूर्ण मानव जातीला निसर्ग,हवा,पाणी आणि जैविक व अजैविक परिसंस्था यांचे जतन व संरक्षण करण्याची शिकवण देतो.संपूर्ण मानव जातीने शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करून पृथ्वीचे वैभव सुरक्षित राहील याची दक्षता घेणे काळाची गरज बनली आहे.

आजकाल बहुतांश देशातील लोक आणि विशेषतः भारतातील लोक पृथ्वी आपली नसून ती परग्रहावरील एलियन लोकांची आहे अशा थाटात वावरत आहेत. कारण पृथ्वीवर आपण सगळे लोक पृथ्वीचा विनाश करण्यासाठी आतुरलेले दिसत आहोत.जिकडे तिकडे हवा प्रदूषण,जल प्रदूषण, ध्वनी प्रदुषण वाढवण्याची आणि जैविक व अजैविक परिसंस्थामध्ये हस्तक्षेप करण्याची मानवांनी जणू स्पर्धा सुरू केली आहे.पृथ्वीला स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा मी एकट्याने ठेका घेतलेला नाही अशी प्रत्येकाची मानसिकता झाली आहे.

त्यामुळे पृथ्वीचे एकेकाळचे अस्सल नैसर्गिक सौंदर्य विविध प्रदुषणामुळे काळवंडले आहे.हे प्रदूषण असेच वाढत गेले तर आपला आणि पृथ्वीचा अंतिम काळ अगदी तोंडावर येऊन थांबणार आहे.

आपल्या भारतापुरता विचार करायचा झाला तर आपण भारतीय लोक इतर देशांच्या तुलनेत विविध प्रकारचे प्रदूषण करण्यात आघाडीवर आहोत. भारतातील अनेक शहरे प्रदुषणाने गिळंकृत केल्याचे दिसून येते. राजधानी दिल्लीमधील हवा कमाल मर्यादेची प्रदूषित झाली आहे. तेथील नागरिकांना श्वसनासाठी ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे.श्वसनाचे आजार बळावले आहेत.वाहनांचा नेहमीचा गोंगाट व अंधूक सूर्य प्रकाश नित्याची बाब झाली आहे.इतरही शहरांची अशीच दयनीय अवस्था झाली आहे.वाढती लोकसंख्या ही प्रमुख समस्या असून प्रदूषणाबाबत लोकांची मठ्ठ मानसिकता ही फार मोठी डोकेदुखी झाली आहे.कचरा करण्याची वृत्ती आणि प्लॅस्टिकचा अति वापर करण्याची मानसिकता लोक सोडून द्यायला तयार नाहीत. भारतातील सर्वच नद्यांमध्ये आणि अरबी समुद्र व इतर समुद्रांमध्ये जैविक आणि अजैविक कचऱ्याचे आणि प्लॅस्टिकचे बेसुमार प्रमाण वाढले आहे. जिकडे तिकडे प्लॅस्टिकच्या पिशव्या व इतर वस्तू पाण्यावर तरंगताना दिसतात आणि गाव खेड्यांतील शेतांमध्ये सुध्दा प्लॅस्टिक दररोज तुफानी खेळ खेळत आहे.प्रत्येक शहरातील बसस्टँडच्या काही भागात,रेल्वे रुळांच्या कडेला कचरा व दलदलीमुळे कमालीची दुर्गंधी वाढली आहे.या दलदलीत जीवघेणे आजार पसरवणाऱ्या डासांची व जीवाणू विषाणूंची पैदास होत असते.

अनेक झाडांची कत्तल करून भारतात सिमेंट रस्त्याचे जाळे वाढले आहे.प्रदूषण ओकणाऱ्या कारखान्यांची संख्या दररोज वाढत आहे.विविध धार्मिक कार्यासाठी आणि उद्योग धंद्याच्या नावाखाली अनेक प्राचीन झाडांची कत्तल केली गेली आहे.म्हणजे माणूस स्वार्थासाठी कोणत्याही थराला जायला तयार आहे.पर्यायी मार्ग असले तरीही ते नाकारून खोट्या प्रतिष्ठेच्या नावाखाली झाडांची कत्तल करणे संयुक्तिक ठरत नाही. वृक्षांची केलेली कत्तल,जंगलाचे घटलेले प्रमाण,प्रदुषणाचा विळखा आणि प्लॅस्टिकचा सुळसुळाट यांमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे.सध्या उन्हाळ्यात आपण सगळे भाजून निघत आहोत. वातावरणात अचानक बदल होऊन पाऊस धोधो कोसळत आहे, चक्रीवादळ सुटून जिवित हानी होत आहे.विजांचा कडकडाट होऊन व वीज कोसळून अनेक माणसे व शेतातील जनावरे मरण पावत आहेत.नद्यांचे व समुद्राचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे अनेक जलचर प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.तरीपण आपण सगळे गप्प आहोत.सुजान नागरिक,पर्यावरण हितचिंतक व पर्यावरण रक्षक बनायचे सोडून आपण सगळ्यांनी पृथ्वीला लवकर संपवण्याचा घाट घातला आहे.

ही वाईट मानसिकता तात्काळ बंद करून आपण आपल्या पृथ्वीला, पर्यावरणाला,नैसर्गिक साधन संपत्तीला,सगळ्या सजीव सृष्टीला जीवापाड जपले पाहिजे.आपणच आपल्या पृथ्वीला जपले पाहिजे. हवा,पाणी,अन्न,क्षार,खनिजे,इंधन यांचा योग्य व नियंत्रित वापर केला पाहिजे. पृथ्वीचे,निसर्गाचे,झाडांचे आणि पर्यावरणाचे जतन व संरक्षण करणाऱ्या सर्व सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक व पर्यावरण प्रेमी संघटनांचे कार्य अतिशय लाजवाब व प्रशंसनीय आहे. त्यांच्या कार्याला आमचा सलाम!

सर्वांना जागतिक वसुंधरा दिनाच्या

निमित्ताने मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!पृथ्वीचे व पर्यावरणाचे जतन,संवर्धन व रक्षण करण्याची सुबुद्धी सर्वांना मिळो.कचरा व उघड्यावर घाण करणाऱ्या लोकांची मानसिकता बदलली जाओ हीच शुभकामना!

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

## धर्मांतर

गंभीर विषय अत्यंत
कसे चालते धर्मांतर
धर्माधर्मां मधले असे
काय कसले ते अंतर

सखोल शोधा कारणे
पाहे अंतरातअभ्यंतर
सर्वंधर्म सम मर्मकर्म
धार्मिक तत्वे समांतर

रचले जातात षड्यंत्रे
बळ जबरी स्थित्यंतर
रहस्येगुलदस्त्यात ती
काहींना नहो गत्यंतर

मूळव्याधीला रे बगल
बोलतो किती‌अवांतर
देता तत्वां तिलांजली
स्वधर्मा करी कर्मांतर

भ्रष्ट करी सुविचारांला
धर्मांधअघोर कुजांतर
आधीआमीषे दाविली
नशेबाज बनवते नंतर

कुशक्ती धर्मांतरांस्तव
करी जादू जंतर मंतर
शरीरार्थ पुरवे सुविधा
मनावर करी कुजांतर

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# इलेक्ट्रिक वाहनांचा खप तुलनेने कमी... विचार करणे जरुरीचे...

अक्षय तृतीया नुकतीच पार पडली. त्या दिवशी अनेकांनी शुभ मुहूर्तावर वाहने खरेदी केली.एकट्या पुणे शहरात अक्षय तृतीया या दिवशी तब्बल सात हजार ८८५ वाहने नोंद झाली. यामध्ये चार चाकी वाहने चार हजार ९९२ वाहने होती. तर इलेक्ट्रिक वाहनांची संख्या केवळ ३०६ एवढी होती.

यातील विशेष बाब म्हणजे इलेक्ट्रिक वाहने फारच कमी विकली गेली. असे का व्हावे ? या मध्ये त्रुटींचा विचार केला असता चार्जिंग स्टेशनची कमतरता, किमती जास्त असणे, या व अशा अनेक कारणामुळे इलेक्स्ट्रिक वाहनांची संख्या कमी होते ग्राहक प्रथम पेट्रोल व डिझेल वरची वाहने पसंत करतात कारण या प्रकारच्या वाहनाकडे ग्राहकांचा असलेला पारंपरिक



ओढा हे सुद्धा आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वर काही सवलती देऊन ग्राहकांना आकर्षित करणे, चार्जिंग स्टेशनचे जाळे तयार करणे, ग्राहकांना इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे पर्यायांनी सांगणे ही कामे करावयास हवीत.

आज इलेक्ट्रिक वाहनांचा इंधनाचा खर्च पेट्रोल डिझेल पेक्षा कमी आहे. शिवाय ज्यांना सौर ऊर्जेचा वापर करता येणे शक्य आहे त्यांनी इलेक्स्ट्रिक वाहनांचा वापर करणे हिताचे ठरणार आहे.

या शिवाय महत्वाचा मुद्दा म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांमुळे पर्यावरणाला मदत होते. दूषित हवा, आवाज तयार होत नाहीत. सरकार व वाहने तयार करणारांनी इलेक्ट्रिक वाहनांचे फायदे लोकांना पटवून दिले पाहिजेत वाहन तयार करणाऱ्या कंपन्यांनी विविध शिबिरांचे आयोजने करणे जरूर आहे. त्यामुळे लोकांच्यात जागृती निर्माण होईल व खप वाढेल. लोकांच्यात हळू हळू बदल होतील व एक दिवस लोक पूर्णपणे इलेक्ट्रिक वाहने वापरातील. आजच्या काळाची ती गरज आहे.

**–शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बनवस शिवारात अनोळखी तरुणाचा मृतदेह; ओळख पटविण्याचे आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील मौजे बनवस शेतशिवारात एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पालम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. संबंधित अनोळखी इसमाने स्वतःच्या ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून अपघात घडवून घेतल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून तो पुरुष आहे. त्याचा चेहरा लांबट, रंग सावळा व उंची अंदाजे साडेपाच फूट आहे. पोटावर बेंबीच्या वरच्या बाजूस तिळ असल्याची नोंद आहे. अंगात काळ्या रंगाची पॅन्ट, आकाशी रंगाचा शर्ट (AX SHIVSAI Casual Wear असा उल्लेख असलेला), कॉटन कँडी बनियन व लाल रंगाचे अंडरवेअर असा पोशाख आढळून आला.

या प्रकरणी पालम पोलीस ठाण्यात गु.र.नं. १८१ / २०२६ कलम १०६ (१) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तरी संबंधित मृत व्यक्तीची ओळख, नाव, गाव किंवा नातेवाईक याबाबत कोणास काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांच्या ७९७२३०८०९० किंवा पोलीस उपनिरीक्षक शिवकांत नागरगोजे यांच्या ९०७५२६११२७ या मोबाईल नंबर वर किंवा पालम पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पालम पोलिसांनी केले आहे.

## जिंतूरमध्ये ग्रामरोजगार सहाय्यकांचे कामबंद आंदोलन सुरू



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२०, जिंतूर :** ग्रामरोजगार सहाय्यक संघटना, जिंतूर यांच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी एकदिवसीय लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात आले. दिनांक १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या आंदोलनात पंचायत समिती कार्यालय, जिंतूर येथे ग्राम रोजगार सहाय्यक मोठ्या संख्येने सहभागी झाले या आंदोलनात कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रमुख मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. यामध्ये २०२४ पासून थकीत मानधन तात्काळ देण्यात यावे, पूर्णवेळ कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा तसेच मानधन वाढ करण्यात यावी अशा मागण्यांचा समावेश आहे. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, मागण्या मान्य न झाल्यास येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या वेळी अनेक ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते आणि त्यांनी शासनाविरोधात घोषणाबाजी करत आपला निषेध व्यक्त केला. सदर आंदोलनामुळे पंचायत समितीतील काही कामकाजावर परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले.

# सुशोभीकरणाचा बोजवारा; डिव्हायडरवरील कोट्यवधींची झाडे वाळून खाक

## कल्याण फाटा ते देसाई नाका मार्गावरील हरित पट्टा नष्ट; मनसे आक्रमक

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, शिळफाटा (ठाणे) :** सुशोभीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करून लावलेली झाडे देखभालीअभावी मृत झाल्याचा संतापजनक प्रकार ठाण्यात उघडकीस आला आहे. कल्याण फाटा ते देसाई नाका या महत्त्वाच्या मार्गावरील डिव्हायडरमधील संपूर्ण हरित पट्टा वाळून गेला असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी हा प्रकार उजेडात आणला आहे.

**प्रशासकीय समन्वयाच्या अभावाने पर्यावरणाची हानी :**


या मार्गाचे काम व डिव्हायडरची उभारणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) केली होती. वृक्षारोपणदेखील त्याच माध्यमातून झाले. मात्र, त्यानंतर वृक्षांना नियमित पाणीपुरवठा व देखभालीची जबाबदारी कोणत्या यंत्रणेकडे होती, याबाबत स्पष्टता नसल्याने डिव्हायडरवरील शेकडो झाडे पूर्णपणे नष्ट झाली आहेत.

**लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह :**

मुंबई-ठाणे ते कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर या मार्गावर दररोज लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांची ये-जा असते. तरीही रस्त्याच्या मध्यभागी वाळलेल्या अवस्थेतील झाडे कुणाच्याही निदर्शनास न येणे, ही बाब गंभीर असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**सार्वजनिक निधीचा अपव्यय आणि पर्यावरणाची हानी : शरद पाटील**

या प्रकरणाची दखल घेत शरद पाटील यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (चचठ्ठअ) कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सुशोभीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. मात्र, वृक्षारोपणानंतर देखभालीकडे पूर्णतः दुर्लक्ष होते. हा



सार्वजनिक निधीचा अपव्यय असून पर्यावरणाचीही मोठी हानी आहे, असा आरोप पाटील यांनी केला.

त्यांनी संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच काम पूर्णत्वाचा दाखला सादर करून ठेकेदाराने देयक घेतल्याचा संशय व्यक्त करत, या प्रकरणाची सखोल चौकशी करून झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संबंधितांकडून करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**प्रशासनाची निष्क्रियता कायम :**

शरद पाटील यांनी समाजमाध्यम द्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या घटनेमुळे ठाणे महापालिका व संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका होत असून, नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

वृक्षारोपण केल्यानंतर त्याच्या संगोपनाची जबाबदारी निश्चित करण्याची व त्यावर नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा उभारण्याची गरज या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# मुंबईत मध्य रेल्वेच्या १० स्थानकांवर सुरू होणार 'आपत्कालीन वैद्यकीय कक्ष'

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, मुंबई :** मुंबईतील उपनगरी रेल्वे मार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ईशान्य मुंबईचे खासदार व केंद्रीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय दिना पाटील यांच्या मागण्यांची गंभीर दखल घेतली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर मध्य रेल्वेच्या दहा महत्त्वाच्या स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबईच्या उपनगरी रेल्वे मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कसारा, खोपोली आणि कर्जत या मार्गांवर सुमारे ९० रेल्वे स्थानके आहेत. मात्र, यापैकी केवळ चार स्थानकांवरच वैद्यकीय सुविधा उपलब्ध असल्यामुळे अपघातग्रस्त प्रवाशांना वेळेवर उपचार मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. अनेकदा जखमी प्रवाशांना रुग्णालयात नेण्यापूर्वीच उपचाराअभावी जीव गमवावा लागत असल्याने या प्रश्नावर खा. संजय दिना पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. यासंदर्भात त्यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना पत्र पाठवून प्रशासनाच्या निष्क्रियतेवर बोट ठेवले होते.

तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी




झालेल्या बैठकीत प्रत्येक स्थानकावर किमान प्राथमिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी ठामपणे मांडली होती. 'गोल्डन अवर'मध्ये जखमींना तात्काळ उपचार मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये प्रत्येक स्थानकावर ऑक्सिजन, स्ट्रेचर, आवश्यक औषधे, बेसिक लाईफ सपोर्ट सुविधा उपलब्ध करणे, प्राथमिक उपचार पेट्या ठेवणे, तसेच स्टेशन मास्टर, टीसी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय प्रशिक्षण देणे यांचा समावेश आहे.

पूर्वी मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर यांसारख्या स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष कार्यरत होते. मात्र गेल्या वर्षभरात या सुविधा बंद झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच पार्श्वभूमीवर खा. पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करत हा मुद्दा केंद्र सरकारसमोर मांडला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले अ

सून आता कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, चेंबूर, मानखुर्द, घाटकोपर, ठाणे, मुंब्रा, टिटवाळा आणि कर्जत या स्थानकांवर टप्प्याटप्प्याने आपत्कालीन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या निर्णयामुळे दररोज लाखो प्रवाशांची 'जीवनवाहिनी' असलेल्या मुंबई उपनगरी रेल्वेमध्ये प्रवास अधिक सुरक्षित होणार असून अपघातग्रस्तांना तात्काळ उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

दरम्यान या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करत खा. संजय दिना पाटील यांनी सांगितले की, ही केवळ सुरुवात असून पुढील काळात सर्व रेल्वे स्थानकांवर अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्न सुरू ठेवणार आहे. तसेच प्रत्येक स्थानकाबाहेर रुग्णवाहिका सेवा उपलब्ध व्हावी यासाठीही पाठपुरावा केला जाईल. दरम्यान, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून, रेल्वे प्रशासनावर टीका करणाऱ्या मुद्द्यांनंतर आता सकारात्मक पाऊल उचलले गेले असल्याचे स्पष्ट होत आहे.

# एलएलबीच्या परीक्षा पुढे ढकलल्या !

## आ. अडबाले यांच्या मागणीनंतर गोंडवाना विद्यापीठ जारी करणार नवीन वेळापत्रक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** एलएलबी तिसऱ्या वर्षाच्या चौथ्या सेमिस्टरच्या परीक्षा तिसऱ्या सेमिस्टरच्या परीक्षेनंतर अत्यंत कमी कालावधीत घेण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठी नाराजी होती. अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ. सुधाकर अडबाले यांनी कुलगुरू यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर एलएलबीच्या तिसऱ्या व पाचव्या वर्षाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत एलएलबी तिसऱ्या वर्षाच्या तिसऱ्या सेमिस्टरची परीक्षा जानेवारी २०२६ मध्ये पार पडली. त्यानंतर २ फेब्रुवारी पासून कॉलेज सुरू झाले. कॉलेज सुरू होताच मूट कोड प्रॅक्टिकल दोन महिने चालले. इंटरनॅशनल कॉन्फरन्स झाली. सोबतच मार्च पासून इंटरशिप सुरू झाली. वार्षिक संमेलन, घटक चाचणी, असायमेंट हे सर्व लागोपाठ सुरू असतानाच २२ एप्रिल २०२६ पासून चौथ्या सेमिस्टरच्या परीक्षा वेळापत्रक आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळच मिळाला नाही.

या पार्श्वभूमीवर आ. सुधाकर अडबाले यांनी विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन गोंडवाना विद्यापीठ कुलगुरू यांच्याकडे तातडीने पाठपुरावा केला. त्यांना सर्व बाबी समजून सांगितल्या. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि परीक्षेची योग्य तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा, यासाठी त्यांनी तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या वर्षाच्या सेमिस्टर परीक्षा पुढे ढकलण्याची ठाम मागणी केली.

आ. सुधाकर अडबाले यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून गोंडवाना विद्यापीठाने एलएलबी तिसऱ्या वर्षाच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या सेमिस्टर, पाचव्या वर्षाच्या तिसऱ्या ते दहाव्या सेमीस्टर आणि चौथ्या वर्षाच्या सेमीस्टरच्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक आजच जारी करणार असल्याचे कुलगुरू यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असून त्यांनी आ. सुधाकर अडबाले यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# सोयगाव नगरपंचायत अंतर्गत,

## सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, सोयगाव :** शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सोयगाव नगरपंचायत अंतर्गत सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमि पूजन सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले.

या विकासकामांसाठी आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून जवळपास १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेअंतर्गत सोयगाव येथील वार्ड क्रमांक ८, शेवळी परिसरात चिल्ड्रन पार्क उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच दयानंद नगर भागात सिमेंट काँक्रीट नाली बांधकाम करण्यात येणार आहे.

याशिवाय शहरातील बायपास रोडजवळ बसस्थानक उभारण्याचा महत्त्वाचा प्रकल्पही या अंतर्गत मंजूर करण्यात आला आहे. अल्पसंख्यांक बहुल नागरिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत गावांतर्गत सिमेंट काँक्रीट नाली बांधकामाची कामेही करण्यात येणार आहेत. या कामांचे उद्घाटन नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते संपन्न झाले.

सोयगावच्या विकासासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुरावा मुळे आज ही कामे प्रत्यक्षात येत आहेत, सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांच्या या विविध विकास कामांमुळे शहरातील मूलभूत सुविधा अधिक मजबूत होतील आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. आगामी काळातही आमदार अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शन व पुढाकाराने सोयगावचा विकास अधिक वेगाने पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे नगराध्यक्ष अब्दुल समीर म्हणाले.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर काळे, सिल्लोडचे उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, सय्यद नासेर हुसेन, अकिल देशमुख, शिवसेना तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण, कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण, सांडू तडवी, नगराध्यक्ष आशाबी तडवी , न.प. तील शिवसेना गटनेते अक्षय काळे, नगरसेवक संतोष बोडखे, दिपक पगारे, हर्षल काळे, रऊफ शेख, भगवान जोहरे, गजानन कुडके, लतिफ शहा, संदीप सुरळकर, कदीर शहा, राजू दुतोंडे, किशोर मापारी, नारायण घनघावं, विष्णू इंगळे, गजानन कुडके, तसेच सलीमखा पठाण,मोतीराम पंडीत, विशाल चव्हाण, श्रावण जाधव, रमेश भंगी आदिंसह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# मुक्रमाबादला विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी फांद्यांची छाटणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२०, मुखेड (नांदेड) :** उदगीरहून ३३ के.व्ही मुक्रमाबादला विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईनला झाडाच्या फांद्याम ुळे अडथळा निर्माण होऊ नये व विद्युत पुरवठा सुरळीत सुरू राहावा म्हणून मान्सून पूर्व मुक्रमाबाद येथील महावितरणचे कर्मचारी भर उन्हात अंदाजे २७ किलोम ीटर मधील कट्टर च्या मदतीने फांद्या तोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मुक्रमाबाद येथील ३३ के व्ही.ला गेल्या अनेक वर्षापासून अंदाजे ३३ किलोमीटर उदगीर येथून मुख्य लाईनद्वारे विद्युत पुरवठा नियमित सुरू असून यात मुक्रमाबाद ३३ किव्ही अंतर्गत चार फिटर च्या माध्यमातून अंदाजे चाळीस गावे असून यात वाडी तांडे यांचा समावेश असून या गावांना नियमित विद्युत पुरवठा सुरळीत आहे. पण ही मुख्य लाईन खूप जिर्ण झाल्यामुळे या लाईन वरील तारा, ब्रॅकेट, विद्युत रोधक, जीर्ण झाल्यामुळे एखादा वादळी वारा झाल्यास विद्युत पुरवठा तासनतास खंडित होतो. याचा नाहक त्रास नागरिकांना सोसावा लागत आहे यामुळे या मुख्य लाईनच्या दुरुस्तीचे काम करण्याची मागणी दरवर्षी होत असते.

विषेश म्हणजे याभागातील विजबिल वसुली बऱ्यापैकी असून देखील तांत्रिक अडचणीचा मोठा अभाव आहे. ३३ किलोमीटर उदगीर होऊन विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य लाईन खालील झाडांचे फांद्या घुसून अडथळा निर्माण करत असल्याने बऱ्याचदा विद्युत पुरवठा खंडित होत आहे. उन्हाची तिव्रता लक्षात घेता सहाय्यक अभियंता राजु भुजबळे यांनी मान्सून पूर्व ही कामे पूर्ण होण्याच्या अनुषंगाने गेल्या काही दिवसापासून म



हावितरण कर्मचाऱ्यांच्या मदतीने अंदाजे २७ किलोमीटर विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य लाईन खालील झाडांच्या फांद्या कट्टर च्या मदतीने कापण्याच्या कामावर जोर दिल्याने पावसाळ्यात विद्युत पुरवठा सुरळीत राहणार असल्याची माहिती भुजबळे यांनी दिली.

तसेच हाळणी ते दापका ३३ के.व्ही.ला सहा किलोमीटर अंतरा वरून विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईन खालील झाडाचे फांद्या तोडण्याचे काम सध्या मुक्रमाबाद महावितरण कर्मचाऱ्या कडून उन्हाचा पारा तीव्र असतानाही युद्ध पातळीवर काम सुरू आहे. हे काम यशस्वी करण्यासाठी मुक्रमाबाद महावितरण कंपनीचे कर्मचारी सुहास वाघमारे, प्रकाश गनिमे, व्यंकटराव मि रगुडे, उध्दव काळे, ज्ञानेश्वर माकणीकर, दत्तात्रेय अस्वले, अशोक इडलवार, उमेश वडमीलवार, अंबादास इंगळे, विनायक फुलारी, नामदेव गंदलवाडसह ठेकेदार सादीक यांच्या मदतीने हे काम मान्सून पुर्व पुर्णत्वाकडे जात आहे.

# जिल्हा परिषद कृषी विभागाकडून खरीप हंगामाचे नियोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, ठाणे :** जिल्हा परिषद ठाणेच्या कृषी विभागामार्फत आगामी खरीप हंगामासाठी निविष्ठा नियोजन करण्यात आले असून आवश्यक निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर भात व तूर बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे.

तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष, तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्या आणि भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. ठाणे जिल्ह्यात खरीप हंगामाखाली सरासरी सुमारे ६०,००० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी भात पिकाखालील सरासरी क्षेत्र ५५,००० हेक्टर आहे. मागील वर्षी ५५,१४३ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड करण्यात आली होती. यंदाच्या हंगामातही सुमारे ५५,००० हेक्टर



क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

खत उपलब्धतेबाबत कृषी विभागाने ११,०८८ मेट्रिक टन रासायनिक खतांची मागणी केली असून शासनाकडून जिल्ह्यासाठी ११,५५० मेट्रिक टन खतसाठा मंजूर करण्यात आला आहे. त्यामध्ये युरिया ९,७०० मेट्रिक टन, डीएपी २०० मेट्रिक टन, एमओपी ५० मेट्रिक टन, एसएसपी १०० मेट्रिक टन तसेच संयुक्त खते १,५०० मेट्रिक टन यांचा समावेश आहे.बियाणे उपलब्धतेच्या दृष्टीने जिल्ह्यासाठी एकूण २२ हजार क्विंटल बियाण्यांच्या आवश्यकता असून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व खाजगी बियाणे उत्पादक कंपन्या साधारणपणे १५ हजार ते १६ हजार क्विंटल बियाणांचा पुरवठा करणार आहेत.

उर्वरित सहा हजार क्विंटन बियाणे शेतकरी स्वतः कडील वापरणार आहेत. बियाणांची कोणत्याही प्रकारची कमतरता पडणार नाही हे सर्व बियाणे सुधारित व संकरीत दोन्ही प्रकारचे असेल. खरीप हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी कृषी विभागामार्फत सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद ठाणेचे कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले आहे.

# कामठी येथील आयटीआयच्या इमारतीचे लोकार्पण

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये जून पासून नवीन अभ्यासक्रम होणार सुरु - मंत्री मंगल प्रभात लोढा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विविध नाविन्यपूर्ण विकास योजना, पारदर्शकता व प्रशासकीय पातळीवर होणारा विलंब टाळण्यासाठी ईज ऑफ डुईंग बिझनेस सारख्या शासनाच्या तत्पर धोरणामुळे राज्यात म ोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढली. यातून औद्योगिक, सेवा, डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, सौर विद्युत तंत्रज्ञान क्षेत्रात अफाट रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. काळाशी सुसंगत नवनवीन आवश्यक असणारे कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळावेत यासाठी येत्या जूनपासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करू असे कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी जाहीर केले.



कामठी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण व या संस्थेला शहीद हेमंत करकरे असे नामकरण राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती होती. याचबरोबर माजी आ. देवराव रडके, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचानालयचे संचालक सतीश सूर्यवंशी व मान्यवर उपस्थित होते.

सौर ऊर्जा तंत्रज्ञान, याची उपकरणे व त्याची निगा, डिजिटल इंडियाला साकारणारे तंत्रज्ञान व सेवाक्षेत्र याला अधोरेखित करून ग्रामीण भागातील युवकांना या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधीवर स्वार होता यावे यासाठी नवीन कोर्स, ट्रेड शासकीय तंत्रनिकेतन मध्ये सुरु व्हावेत व यातील काही कोर्स कामठी येथे सुरु व्हावेत अशी मागणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या उदघाटनपर भाषणात केली होती. मंत्री श्री लोढा यांनी ही मागणी नम्रतेने स्वीकारत कामठी आयटीआय येथे नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासह येथील प्रशिक्षण संस्थेच्या प्रगतीचा प्रत्येक महिन्याला आढावा घेऊन राज्यातील एक आदर्श शासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून याला नावारूपास आणू असे सांगितले.

राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (खढख) शहीद हेमंत करकरे यांचे नाव देण्याचा म हत्त्वपूर्ण निर्णय कौशल्य विकास विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे देशासाठी बलिदान देणाऱ्या शूर अधिकाऱ्याच्या स्मृतीला अभिवादन करण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा जागृत होईल असा विश्वास कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

येत्या ५ वर्षात कोराडी येथील शैक्षणिक व प्रशिक्षण संकुल भक्तीसह सामाजिक उत्तरदायित्त्वाचे मोठे केंद्र म्हणून साकारेल.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या राजकीय जबाबदारींना समर्थपणे पेलत कोराडी येथील संस्थानाच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्त्वाचे मोठे कार्य केले आहे. या भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या दिशा मिळाव्यात यासह त्यांना गारमेंट, होजिअरी व इतर कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून धैर्य दिले आहे. याठिकाणी अत्यंत आदर्श असे कौशल्य विद्यापीठ साकारण्याची सर्व क्षमता आहे. त्यांनी दूरदृष्टी ठेवून नियोजन केले अशा शब्दात मंत्री श्री लोढा यांनी गौरव केला. कोराडी हे भक्तीसह सामाजिक उत्तरदायित्त्वाचे म ोठे केंद्र म्हणून समोर असा विश्वास त्यांनी व्यक्त करून यासाठी शासन व इतर उपक्रमातून आम्ही निश्चित हातभार लावू असे सांगितले.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही होईल लाभ - महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

बदलत्या काळाप्रमाणे रोजगार व स्वयंरोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण झाल्या आहेत. केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकासासाठी गत दहा वर्षात सातत्याने प्रयत्नरत राहून ग्रामीण भागात कौशल्य प्रशिक्षणासाठी शासकीय शैक्षणिक यंत्रणांना नवे रूप दिले आहे. औद्योगिक, सेवा व डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा क्षेत्रातील रोजगाराच्या अफाट संधीचा लाभ ग्रामीण भागातील युवकांना होण्यासाठी आणखी नव्या अभ्यासक्रमांची जोड आवश्यक आहे. या कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपले युवक जागतिक पातळीवर आपले कसब व कौशल्य सिद्ध करून दाखवतील असा विश्वास महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

कामठी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था विकसित व्हावी, यात आणखी तांत्रिक कौशल्य विध्यार्थ्यांना शिकता यावे यासाठी संस्थेला जिल्हा वार्षिक योजनेतून ४ कोटी ५० लाख रुपयांचा निधी या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देऊ असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी फक्त प्रमाणपत्र मिळवणे हे अंतिम ध्येय न ठेवता कौशल्य आत्मसात करावीत, नवीन गोष्टी शिकण्याची तयारी आणि प्रामाणिकपणे मेहनत करावी असे आवाहन त्यांनी केले. आज घेतलेले प्रशिक्षण उद्या तुमच्या यशाचा पाया ठरेल. तुमच्यातील प्रत्येक विद्यार्थी हा आपल्या कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा अभिमान बनू शकतो मात्र त्यासाठी जिद्द आणि सातत्य ठेवा असे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

कार्यक्रमास अनिल निधान, येरखेडा नगरपंचायत चे नगराध्यक्ष राजकिरण बर्वे, मंगेश यादव, ब्रम्हा काळे, राकेश काळे, नंदाताई बारई, लालसिंग यादव, विनोद संगेवार, अंतराताई वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

# थोडक्यात

## बालाजी कुलकर्णी यांना गुरु-गौरव पुरस्कार




**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२०, उदगीर (लातूर) :** घोणसी येथील उज्ज्वल माध्यमिक विद्यालयातील शिक्षक बालाजी कुलकर्णी यांना महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद लातूर यांच्या वतीने दिला जाणार गुरु-गैरव पुरस्कार जाहीर झाला असून. हा पुरस्कार दि१९ एप्रिल रोजी लातूर येथे नागपूर विभाचे पदवीधर माजी आमदार ना.गो.गाणार यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी त्यांच्या सोबत कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.गुरु -गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सचिव प्राचार्य राम अदावळे, मु.अ.भानुदास गायकवाड, राम भोसले, संतोष डावळे, बालाजी भोसले, संतोष बिरादार, किशन केंद्रे, सदाशिव सुडे, आमोल गोपडे, यांच्या सह अदिंनी अभिनंदन केले.

## नवी मुंबईत १२ तास पाणीपुरवठा बंद महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२०, सीबीडी (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत शहरातील जलवाहिनी दुरुस्ती व सुधारणा कामे हाती घेण्यात येणार असून बुधवार दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा तात्पुरता बंद राहणार आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, सीबीडी सेक्टर-२८ येथील पंप हाऊस येथे मॅनिफोल्ड व व्हॉल बसविणे, तसेच कळंबोली सर्कल, नेरुळ सेक्टर-१९ व वंडर पार्क परिसरातील जलवाहिन्यांवर व्हॉल बसविण्याची कामे करण्यात येणार आहेत. याशिवाय, घणसोली सेक्टर-२ येथे ९०० मिमी. व्यासाच्या पाईपलाईन जोडणीचे काम देखील करण्यात येणार आहे.

या कामांमुळे बुधवार, दि.२२ एप्रिल रोजी सकाळी १०.०० ते रात्री १० वाजेपर्यंत (१२ तास) मुख्य जलवाहिनीवरील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे.

या कालावधीत बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विभागांमध्ये पाणीपुरवठा होणार नाही. तसेच सिडकोच्या खारघर व कामोठे नोडमध्येही पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

यामुळे बुधवार संध्याकाळचा पाणीपुरवठा होणार नसून, गुरुवार, दि.२३ एप्रिल रोजी सकाळचा व संध्याकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या अतिरिक्त शहर अभियंत्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या कालावधीत पाण्याचा जपून व आवश्यकतेनुसार वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे.

## सोयगाव शहरातील पाहिल्या बाल उद्यानाचे वार्ड क्र ८ मध्ये उदघाटन


### नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांच्या प्रयत्नांना यश



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२०, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव शहरातील पाहिलं बाल उद्यान वार्ड क्र ८ मध्ये मंजूर झाले असून सोमवार, दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सिल्लोड चे नगराध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांच्या हस्ते कामाचे उदघाटन करण्यात आले.सोयगाव नगर पंचायतच्या वार्ड क्र ८ च्या नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे व माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या विशेष प्रयत्न आणि पुढाकारातुन सोयगाव शहरातील पहिले बाल उद्यान मंजूर झालेले आहे. दलित्तेतर वस्ती विकास योजनेतून या कामाला सुमारे ४९ लाख रुपये निधी मंजूर झालेला आहे. दि.२० एप्रिल शिवसेनेचे युवा नेते सिल्लोड चे नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या हस्ते तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आशाबी तडवी, नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे, गटनेते अक्षय काळे, नगरसेवक संतोष बोडखे, दिपक पगारे, बंटी काळे , गजानन कुडके, भगवान जोहरे, विष्णू इंगळे, लतीफ शहा, कदिर शहा, रउफ शेख, नारायण घनघाव, किशोर मापारी, संदीप सुरडकर, तसेच कडुबा इंगळे, कैलास पिंगाळकर, महेश दुसाने, रत्नाकर सोहनी, विकास रोकडे, ह भ प जितेंद्र महाराज पंडित, संतोष सोहनी, अशोक आगे, नंदू सोहनी, रमेश सोहनी, संदीप चौधरी आदीसह नागरिक उपस्थित होते. आपल्या सोयगाव शहरातील लहान मुलांना खेळण्यासाठी उद्यान असायला हवं म्हणून आमच्या वार्ड क्र ८ असलेल्या मोकळ्या जागेत बाल उद्यानसाठी पाठपुरावा करून मंजुरी मिळविली निधी उपलब्ध करून घेतला आज उदघाटन झाले. लवकरच छानसं बाल उद्यान मुलांना खेळण्यासाठी तयार होईल. एक नाविन्यपूर्ण काम होत असल्यामुळे आनंद होत असल्याची प्रतिक्रिया नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांनी दिली.

## वर्तकनगर येथील नेत्रतपासणी केंद्र व वागळे मधील पशुवैद्यकीय विभागाचे नुतनीकरण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, ठाणे :** ठाणे म हानगरपालिकेच्या वतीने वर्तकनगर येथील स्व. निर्मलादेवी चिंतामण दिघे रुग्णालय, लोकमान्य टिळक नर्सिंग होम येथे नेत्र तपासणी व उपचार केंद्र व वागळे इस्टेट येथील जीर्ण झालेल्या पशु शस्त्रक्रिया विभागाचे नूतनीकरण करून नवीन ८८ पिंजऱ्यांसह उदघाटन नुकतेच म हापौर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाणे, स्थानिक नगरसेविका एकता भोईर, संध्या मोरे, यज्ञा भोईर, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील आदी उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा उपक्रम समाजासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.